पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/१००५/१६
पुणे १ दिनांक :-१९ /९/२०१६

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**संजय मोडक एज्युकेशन सोसायटी, हडपसर, पुणे संचलित**
**मोडक इंटरनॅशनल स्कूल, गट नं. १९८८, लोणीकाळभोर, बी वडकी, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०१**

**विषयः-** सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भः-** १. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांचेकडील नाहरकत प्रमाणपत्र क्र. एनओसी २००८/ (१५/०८)/एसई-१, दि. २०/११/२००८
२. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२
३. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दि. २० जून २०१३
४. शासन निर्णय क्र. एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/एसएम-२, दि. १७ जून २०१६.(यादी क्र. ९९१)
५. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. शिउसं/प्राथ२/स्वयंअशाळा/मान्यता/पुनि/ २०१६/ १६८९९, दि. २७ जुलै २०१६

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापना** व दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार **नविन शाळा स्थापन** व दर्जावाढ **करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | **संजय मोडक एज्युकेशन सोसायटी शॉप नं. एस/२६, रामानंद कॉम्प्लेक्स, स.न.२२८, हडपसर, पुणे ४११ ०२८** | **मोडक इंटरनॅशनल स्कूल, गट नं. १९८८, लोणी काळभोर, बी वडकी, ता. हवेली, जि. पुणे** | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.इं) | प्राथमिक ते माध्यमिक (इ १ ली ते ७ वी) | स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१६-१७ |

**अटी व शर्ती**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये सन २०१६-१७ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

MODAK INTERNATIONAL SCHOOL ★ PUNE ★ Affiliated to CBSE Affiliation No. 1131082

Jadhav
PRINCIPAL
MODAK INTERNATIONAL SCHOOL
PUNE.

पुणे जिल्हा परिषद ,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
जा.क्र.जि.प.शिक्षअण /प्राथ.खाप्राशा / १९५ /२०१९
पुणे -१ दिनांक - १७/०७/२०१९

प्रति ,

अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक ,
संजय मोडक एज्युकेशन सोसायटी हडसपर,.पुणे-२८

विषय - सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ - १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४) २०१३.
२. शासन निर्णय जा.क्र एसएफएस -२०१८/प्र.क्र.१२१६/एसएम-२ दि.११/१०/२०१८
३. मा.प्र.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे जा.क्र.शिउसं/प्राथ.-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/९७३/१८दि. ३०/०१/२०१९

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या निर्णयानुसार खालील **अटी व शर्तीवर विद्यमान शाळा प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ.८ वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पूर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नविन शाळा /दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | संजय मोडक एज्युकेशन सोसायटी, हडसपर,.पुणे-२८ | मोडक इंटरनॅशनल स्कुल, लोणीकाळभोर वी वडकी ता.हवेली जि.पुणे. | इंग्रजी | दर्जावाढ इ. ८ वी | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | २०१८-१९ |

अटी व शर्ती

१. संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम,शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केलेल्या शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी आहे.
४. संदर्भ क्र.२ अन्वये सन २०१८-१९ मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे.परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
५. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
६. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहिल.
७. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
९. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहिल.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद ,पुणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१) मा. अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ,मंत्रालय ,मुंबई-३२
२) मा. शिक्षण संचालक (माध्य.व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य ,पुणे-१
३) मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य ,पुणे-१

MODAK INTERNATIONAL SCHOOL PUNE
Affiliated to CBSE Affiliation No. 1131082

संजय मोडक एज्युकेशन सोसायटी
चेअरमन

PRINCIPAL
MODAK INTERNATIONAL SCHOOL
PUNE.